"सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हंटल तर तो उद्या कधीच येत नाही".

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०२ एप्रिल २०२५







# पुढील ३ दिवसात मराठवाड्यात गारपीट होण्याची शक्यता !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, परभणी :** उन्हाळ्याचे तापमान दिवसेंदिवस वाढत असून काल सोमवारी तापमानाने चाळिशीचा पारा गाठला. आज मंगळवारी (दि.१)दिवसभर आकाश ढगाळ राहिल्याने वातावरणात कमालीचा उकाडा जाणवत होता. दरम्यान पुढील तीन दिवसात मराठवाड्याच्या काही भागात कुठे गारपीट तर कुठे हलक्या सरी कोसळतील असा अंदाज वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या हवामानशास्त्र विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.



दरम्यान उद्या बुधवारी (दि.२) छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड जिल्हयात वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किलोमीटर राहून काही ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची तर तूरळक ठिकाणी गारपीटीची शक्यता आहे. बुधवारीच (दि.२) परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड व धाराशिव जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट असे हवामान राहणार आहे. वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ५० किलोमीटर राहून हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

तर गुरुवारी (दि.३) परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्हयात आणि शुक्रवारी (दि.४) लातूर व धाराशिव जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक ताशी ३० ते ४० किलोमीटर राहून हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. पुढील तीन दिवसात कमाल तापमानात हळूहळू २ ते ४ अंश सेल्सिअसने घट होऊन त्यानंतर हळूहळू वाढ होण्याची तर पुढील चार ते पाच दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

सध्या वातावरणात कमालीचा उकाडा जाणवत आहे. तापमान हळूहळू चढत्या भाजणीने वाढत चालले असून या उन्हाळ्यात तापमानाने काल चाळीशीचा पारा गाठला. दरवर्षी एप्रिल आणि मे या दोन्ही महिन्यात परभणीचे तापमान सातत्याने गेल्या काही वर्षांपासून वाढत चालले आहे. एप्रिल महिन्यातील काही दिवसात तर मे महिन्याच्या पूर्वार्धात तापमानाचा पारा ४६ अंशापर्यंत जाऊन पोहोचतो असा परभणीकरांचा अनुभव आहे.

आज दिवसभर ढगाळ वातावरण राहिल्याने तापमान कमी होते मात्र हवेत उकाडा प्रचंड प्रमाणात जाणवत होता.सध्या आंब्याच्या झाडाला मोठ्या प्रमाणात कैऱ्या लगडलेल्या आहेत. अशा परिस्थितीत जर अवकाळी पाऊस पडला तर त्याचा फटका आंब्याच्या झाडांना बसण्याची शक्यता आहे.

# मोदी २०४७ पर्यंत पंतप्रधान राहणार, बावनकुळे यांचा अजब दावा...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नागपूर दौऱ्यानंतर मोदींचा उत्तराधिकारी कोण या चर्चांना उधान आले आहे. खासदार संजय राऊत यांना नरेंद्र मोदी यांचा वारसदार कोण असेल? असा प्रश्न विचारण्यात आला.

यावर तो नेता बहुतेक महाराष्ट्रातील राहणार असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ठरवेल असे राऊत म्हणाले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः सक्षम असून त्यांचा उत्तराधिकारी शोधण्याची काहीही गरज नाही. २०२९ मध्ये देश पुन्हा त्यांनाच पंतप्रधान म्हणून पाहण्यास इच्छुक असल्याचे वक्तव्य त्यांनी केले.

यानंतर आता महसूल मंत्री व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी २०४७ पर्यंत मोदीच पंतप्रधान असतील. २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदीनी केला आहे. हा संकल्प त्यांच्याच नेतृत्वात पूर्ण केला जाईल, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांना



तुम्ही मोदींचे उत्तराधिकारी राहणार आहात का? असा प्रश्न फडणवीस यांना विचारला असता त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वडील जिवंत असताना त्यांचा उत्तराधिकारी शोधणे ही आमची परंपरा नाही. ही मुघल संस्कृती आहे. तसाही उत्तराधिकारी होण्याची आपला काहीही संबंध नाही, असेही फडणवीस म्हणाले. यावर आरएसएसचे माजी सहकार्यवाह भय्याजी जोशी यांना विचारणा केली असता त्यांनी याबद्दल मला काही माहिती नाही असे स्पष्ट सांगितले. त्यानंतर आत चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या वादात उडी घेतली आहे.

बावनकुळे नेमके काय म्हणाले?


चंद्रशेखर बावनकुळे यांनी संजय राऊत यांच्या वक्तव्याचा समाचार घेणोर ट्विट केले आहे. त्यात ते म्हणाता की, संजय राऊत यांचे विधान ही केवळ राजकीय स्टंटबाजी आहे. ७५ वर्षे वयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकारण सोडावे, असा कोणताही नियम नाही किंवा असा कुठलाही निर्णय झालेला नाही. भाजपच्या कोणत्याही अधिकृत धोरणातही असे म्हटलेले नाही. भारतीय संविधानातही असा कोणताही ठराव किंवा नियम नाही. भाजपचे नेते अटलबिहारी वाजपेयी वयाच्या ७९ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. तर मोरारजी देसाई ८३ आणि डॉ. मनमोहन सिंग तर वयाच्या ८१ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. पण मानसिक संतुलन बिघडल्याने भाजप द्वेषाची कावीळ झालेल्या राऊतांना हे आठवणार नाही.

भारतीय लोकशाहीत पंतप्रधानांनी कधी निवृत्त व्हायचे, हे संजय राऊत यांच्यासारख्या सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही. तर निवडणुकीतील जनादेशावर आणि लोकांच्या आशीर्वादावर ठरते. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांचा कार्यकाळ या देशातील जनता ठरवते, संजय राऊत किंवा विरोधकांना तो अधिकार नाही. २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदीजींनी केला आहे. हा संकल्प त्यांच्याच नेतृत्वात पूर्ण केला जाईल, असेही बावनकुळे म्हणाले.

# अनैतिक संबंधात पतीचा अडसर, प्रियकराच्या मदतीने पतीचा खून

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, पुणे :** अनैतिक संबंधात पती अडसर ठरत असल्याने प्रियकराच्या मदतीने पत्नीने पतीचा खून केल्याची घटना पुण्यातील लोणी काळभोर येथे घडली आहे.या घटनेमुळे लोणी काळभोर परिसरात खळबळ उडाली आहे. रविंद्र काळभोर वय ४५ असे मयत पतीचे नाव आहे.तर आरोपी पत्नी शोभा रविंद्र काळभोर वय ४२ आणि आरोपी प्रियकर गोरख त्र्यंबक काळभोर वय ४१ या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर येथील वडाळी वस्ती परिसरात मयत रवींद्र काळभोर आणि आरोपी पत्नी शोभा काळभोर राहण्यास आहे.तर आरोपी पत्नी शोभा काळभोर आणि आरोपी प्रियकर गोरख काळभोर या दोघांमध्ये मागील पाच वर्षापासून प्रेम संबंध होते. या अनैतिक प्रेमसंबंध बाबत रविंद्र काळभोर यांना समजले. त्यावर रविंद्र काळभोर यांनी पत्नी शोभा यांना अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न केला. तरी देखील पत्नी काही केल्या ऐकत नव्हती,ती प्रियकराला भेटण्यास जात होती.त्यावरून दोघांमध्ये अनेक वेळा भांडण झाली.

सततच्या भांडणाला आरोपी पत्नी शोभा वैतागली होती.त्यामुळे आरोपी पत्नी शोभा आणि आरोपी प्रियकर गोरख यांनी रविंद्र काळभोर यांना मारहाण करून कायमच अपंग करून टाकण्याचा प्लान केला. रविंद्र काळभोर कुठ एकटा सापडल्यावर त्याच्यावर हल्ला करायचा,ती वेळ पत्नी शोभा आणि आरोपी गोरख हे पाहत होते. त्याच दरम्यान काल रात्री रविंद्र काळभोर हे घराबाहेर झोपले आहे. ही बाब शोभा यांनी प्रियकर गोरख याला सांगितली. या दोघांमध्ये जवळपास चार ते पाच वेळा काल रात्री फोनवरून बोलणे झाले.त्यानुसार मध्यरात्रीच्या सुमारास प्रियकर गोरख याने रवींद्र काळभोर यांच्या डोक्यात खोऱ्याच्या लाकडी दांडक्याने वार केले.त्यामध्ये अधिक रक्तस्त्राव झाल्याने, रविंद्र काळभोर यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

त्यानंतर पहाटेच्या सुमारास रवींद्र काळभोर यांच्या बाजूला राहणार्या आजी झाडू मारण्यासाठी बाहेर आल्या होत्या. त्यावेळी रवींद्र काळभोर हे रक्ताच्या थारोळ्यात आढळून आले. या घटनेची माहीती आजींनी आजूबाजूच्या लोकांना दिल्यावर,याबाबत पोलिसांना तात्काळ कळविण्यात आले.या प्रकरणातील आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक रवाना करण्यात आली होती.पण त्याच दरम्यान पत्नी शोभा यांच्या हालचाली काही संशयित दिसून आल्या आणि काही वेगळी माहीती आमच्यासमोर आली. त्यानंतर आरोपी पत्नी शोभा काळभोर यांच्याकडे चौकशी केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आणि पुढील काही तासात आरोपी गोरख काळभोर याला देखील ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करून अटक करण्यात आल्याचे लोणी काळभोर पोलिसांनी सांगितले.

## थोडक्यात

### कुस्त्यांचा जंगी आखाडा आणि बैलगाडेही धावणार !

### टाकळी ढोकेश्वर येथील बनाईदेवी यात्रोत्सव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळीढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाईदेवी यात्रेनिमित्त दि.२ एप्रिल रोजी संपन्न होणार असून यात्राउत्सवा निमित्त कुस्त्यांचा जंगी आखाडा तसेच बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष माजी सरपंच शिवाजी खिलारी व बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे यांनी दिली. बुधवारी सकाळी ८.३० वाजता मळगंगा देवीची काठी मिरवणूक, दुपारी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार आहे. रात्री ७.३० वाजता भव्य छबिना मिरवणूक रात्री १० वाजता मळगंगा मंदिरासमोर जागरण गोंधळ,गुरुवार दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता मुक्ताई देवीची काठी मिरवणूक, यात्रेनिमित्त सकाळी ९ ते ६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रात्री ८.३० वाजता छबिना मिरवणूक, रात्री १० वाजता देवीसमोर जागरण गोंधळ यात्रोत्सवात दररोज भव्य मिरवणुकीसाठी मुख्य पारंपारिक पद्धतीने ढोल ताशा सनई पथक खास आकर्षण असणार आहे. बैलगाडा शर्यतींसाठी ७१ हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात येणार असून द्वितीय क्रमांकास ५१ हजार, तृतीय क्रमांक ३१ हजार तर चतुर्थ क्रमांकास ११ हजार रुपये देण्यात येणार आहे. या बक्षीसां व्यतिरिक्त सर्वात जास्त धावणाऱ्या बैलास घाटाचा राजा म्हणून आकर्षक बक्षिसे पहिल्यात पहिल्या येणाऱ्या बैलगाड्यास ११ हजार देण्यात येणार आहे. बुधवारी पार पडणाऱ्या कुस्त्यांच्या आखाड्यांमध्ये ५० हजार रुपयांपासून ते ११००० हजार रुपयांचे बक्षीसे देण्यात येणार आहेत. बैलगाडा व कुस्ती शौकीनानी या स्पर्धेचा लाभ घेण्याचे आवाहन बनाईदेवी यात्रा कमिटीच्या वतीने तसेच समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बिबट्याशी वृद्ध महिलेची झुंज, दोन दिवसात दुसरा बळी

**दि.०१, छ.संभाजीनगर :** झुडपामागे दबा धरलेल्या बिबट्याने झडप मारल्याने त्याच्याशी एका वृद्ध महिलेने निकराची झुंज दिली. पण शेवटी बिबट्याच्या हल्लयात ६५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. ही घटना वैजापूर तालुक्यातील जिरी गावात मंगळवारी पहाटे उघडकीस आली. बिबट्याच्या हल्लयात माणूस बळी गेल्याची दोन दिवसातील दुसरी तर, १५ जानेवारीनंतरची ही तिसरी घटना आहे. दोन दिवसांपूर्वी तालुक्यातील वळण येथे शेतवस्तीवर घरासमोर खेळत असलेल्या ऋतुजा कर्डक या तीन वर्षाच्या मुलीचा बिबट्याच्या हल्लयात मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच मंगळवारी पहाटे याच परिसरात असणाऱ्या जिरी गावातीस झुंबरबाई माणिक मांदाळे (वय ६५) यांचा बिबट्याने केलेल्या हल्लयात मृत्यू झाला. या माहितीला वैजापूरच्या वनपरिक्षेत्र अधिकारी प्रीया भिसे यांनी दुजोरा दिला असून, एके ठिकाणी झाडावर चढून बसलेल्या नरभक्षक बिबट्याला पकडण्याचे काम रात्री ८ च्या दरम्यान सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. झुंबरबाई या सकाळी उठून घराबाहेर आल्या. त्याचवेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. जवळपास दहा मिनिट बिबट्या व या महिलेची झुंज सुरू होती. या झटापटीत बिबट्याने या महिलेला जवळपास १०० मीटर अंतरावर फरपटत नेले. अखेर या हल्लयात झुंबरबाईंचा जागेवरच मृत्यू झाला. या परिसरात मनावावर बिबट्याने हल्ला केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. आता पर्यंत बिबट्याने तीन बळी घेतले आहेत. १५ जानेवारी रोजी आईसोबत शेतात गेलेल्या महेश सिद्धार्थ आखाडे या सहा वर्षाचा मुलाचाही मृत्यू बिबट्याच्या हल्लयात झाला होता. तर तलवाडा येथील श्रुती नामदेव आयनर ही सहा वर्षांची मुलगी डिसेंबर महिन्यात बिबट्याच्या हल्यात जखमी झाली होती. याशिवाय अनेक ठिकाणी जनावरांवरही हल्ला झालेला आहे. वारंवार होणाऱ्या बिबट्याच्या हल्लयामुळे परिसरातील गावकर्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जोपर्यंत बिबट्या जेरबंद होत नाही तोपर्यंत या महिलेवर अंतिम संस्कार करणार नाही, असा पवित्रा नागरिकांनी घेतला होता. मात्र, नंतर ग्रामस्थांची समजूत घातली. शिवूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर दुपारी महिलेवर गावात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## संपादकीय



## नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे

नेपाळमधील नागरिक पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले असून या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन जणांचा जीवही गेला आहे. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये सर्वाधिक काळ राजेशाही होती. नेपाळमध्ये जवळपास २४० वर्ष राजेशाही होती. १९९६ साली पहिल्यांदा नेपाळमधील डाव्या विचारांच्या माओवाद्यांनी राजेशाही विरुद्ध बंड पुकारले आणि देशात लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन झाले. जगात सर्वत्र लोकशाहीचे वारे असताना नेपाळमध्ये लोकशाहीच असावी अशा विचाराने तरुणांनी देखील माओवाद्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला मात्र नेपाळमध्ये राजेशाहीची पाळेमुळे खोलवर रुतली असल्याने या आंदोलनाला लगेच यश मिळाले नाही. २००१ साली नेपाळमध्ये अशी घटना घडली ज्यामुळे राजेशाहीची पाळेमुळेच ध्वस्त झाली.

२००१ मध्ये तत्कालीन राजमहालामध्ये नेपाळचे तत्कालीन राजे वीरेंद्र वीर विक्रम शहा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या झाली. या हत्याकांडाने केवळ नेपाळच नाही तर संपूर्ण जग हादरून गेले. या हत्याकांडानंतर ज्ञानेंद्र शहा यांना नवे राजे म्हणून घोषित करण्यात आले. या हत्याकांडानंतर राजेशाही विरुद्ध लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती त्यातच २००५ मध्ये राजे ज्ञानेंद्र यांनी नेपाळची घटना रद्द करून टाकली आणि संसद ही बरखास्त केली त्यामुळे माओवादी आणखी चिडले व त्यांनी उग्र आंदोलने केली त्यांच्या या आंदोलनात लोकशाहीवादीही होते. माओवादी आणि लोकशाही वाद्यांनी राजेशाही विरुद्ध थेट यलगार पुकारला त्यामुळे २००८ साली २४० वर्षाची राजेशाही उखडून पडली आणि लोकशाही प्रस्थापित झाली. या आंदोलनात जवळपास १६ हजार नागरिकांचा जीव गेला. २००८ साली राजेशाही जाऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यावर तेथील नागरिकांना वाटले की लोकशाही मार्गाने आता आपला देश प्रगती करेल. शेजारील भारताने जशी लोकशाही मार्गाने प्रगती केली तशीच प्रगती आपला देशही करेल पण नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरली. कारण नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊन देखील नेपाळला स्थिर सरकार मिळू शकले नाही. २००८ ते आतापर्यंत म्हणजे सतरा वर्षात नेपाळमध्ये १४ सरकारे आली. त्यात पुष्लकमल दहल यांचे सरकार तीन वेळा तर के पी ओली शर्मा यांचे चार वेळा सरकार आले पण एकानेही स्थिर सरकार दिले नाही. या सरकारांच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत. भ्रष्टाचाराम ुळे या सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी निर्माण झाली हीच नाराजी हेरून राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारी मध्ये एक निवेदन जरी केले या निवेदनात त्यांनी म्हटले की राष्ट्र आणि राष्ट्राचे ऐक्य वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. राजे ज्ञानेंद यांच्या या निवेदनानंतर नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा वर्ग रस्त्यावर आला आणि त्यांनी पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन केले. राजेशाही समर्थकांचे हे आंदोलन कुचलून टाकण्यासाठी तेथील सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या आंदोलनांमुळे नेपाळमध्ये लगेच राजेशाही प्रस्थापित होईल असे नाही मात्र राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा जो वर्ग आहे त्यांना आशेचा किरण दिसला आहे. तो वर्ग यापुढे ही राजेशाही साठी रस्त्यावर उतरेल. नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे पुन्हा वाहू लागले आहे हे नक्की.

# भाकर वाढ मायजो....!

जीवन जगण्यासाठी किती ही धडपड....!मनुष्याचे काय समस्त प्राणीम त्रांची प्रथम गरज म्हणजे अन्न....!अन्नाशिवाय मनुष्य जगू शकत नाही.जगभरात कितीतरी मुले माणसे दररोजच्या अन्नापासून मुकतात. त्यांना पोटभर जेवण भेटत नाही कितीतरी अर्धपोटी झोपतात आणि कितीतरी रात्री फक्त पाणी पिऊन झोपतात. त्याला कारणे वेगवेगळे आहेत, भौतिक परिस्थिती, अन्न -उत्पन्न कमी,त्याचबरोबर अन्नासाठी उपलब्धता नाही, आदिवासी भाग, तर काहींना आई-वडील नाही तर काही अपंग.....! दररोज आपल्या शरीर कार्यरत ठेवण्यासाठी शरीराम ध्ये अन्न पाण्याची आवश्यकता असतेच म्हणून कित्येक असाहाय्य गरजू संध्याकाळी भीक मागण्यासाठी फिरतात. कुणी त्यांना म नापासून देतात तर कुणी हेटाळणीची वागणूक देतात. त्यांना टाकून बोलतात. असाच एक गावाकडील उखर्डा /पिंट्या नावाचा मुलगा आई-वडील त्याच्या लहान वयातच वारले. बहिण व लहान भाऊ असा परिवार.स्वतः ची जमीन नाही न स्वतःचे घर एक छोटंसं टीना पत्राचे घर साधारणत दहा ते पंधरा फूट लांबीचे. त्यातच तीन भावांचा गुजारा......! बहिणीचे योग्य वयात लग्न झाले. समाजातील काही समजदार व्यक्ती एकत्रित येऊन तिचे लग्न करून दिले. उखर्डा पिंट्याचे लग्न बाकी. आई-वडील नसल्यामुळे शाळा नाही. इथं एक वेळच्या जेवणाच्या अडचणी तर शाळेचा खर्च कोण भरेल? म्हणून शिक्षणच नाही वय वाढू लागले. कुठे कामाला जाऊन पन्नास शंभर रुपये तो कमाऊ लागला परंतु घरात रांधणार कोण?असा प्रश्न. आणि त्याच्या ज्ञानानुसार त्याला दररोजचे काही काम भेटत नव्हते आणि समाजातील काही व्यक्ती फक्त अशा व्यक्तीचा जास्त फायदा घेतात.त्यांच्याकडून काम करून येतात परंतु त्यांचा मोबदला पुरेशा प्रमाणात देत नाही.त्यात वाढती महागाई....! गरजा भागवायच्या कशा? अशा अनेक गंभीर समस्या त्याचबरोबर घरात कोणी बाई -माणूसही नाही. मग शेवटी भीक मागून खाल्ल्याशिवाय पर्याय नाही...! उखर्डा एकटा म्हणून समाजातील काही व्यक्तींनी त्याचा विवाह करण्याचे ठरवले परंतु अशा अडाणी न शिकलेल्या त्याचप्रमाणे स्वतःचे घर नाही त्याला कोण मुलगी देणार, पण अशा परिस्थितीतही लग्नाची गाठ परमेश्वरा कडेच बांधलेला असतो असे म्हणतात.त्या दृष्टीने त्याचे लग्न एका मुलीसोबत लावून दिले.त्याच्या जीवनमानात बदल होईलअशी आशा, परंतु नाही.....!तीही काहीशी मतिमंद...! शिकलेली तर नाहीच परंतु अनेक गोष्टीत अपूर्ण....! तो एकटा होता त्यात आता एका व्यक्तीची भर पडली.अजूनही समस्या सम स्या.....! सामाजिक दृष्टिकोनातून तिच्या गरजा भागवायची जबाबदारी त्याची झाली. तिचे कपडे लत्ते,जेवण खावणाचं त्यालाच बघावं लागले, ती कुठे शेतात काम ालाही जाऊ शकत नव्हती. अवघड आहे ना खरंच....! परत त्याच्या नशिबी तेच जिनं आलं भिक मागून खायायचं...! त्याला पुन्हा पूर्वीसारखे जीवन जगावे लागले. याउलट आता जबादारीचं ओझं वाढलं. गावात जी पडेल ती कामे करायचे गावातील सरकारी नाल्यातील घाण काढणे, बांधकामावर मि स्त्रीच्या हाताखाली मातकाम...! त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार दीडसे ते दोनशे रुपयांचा मोबदला तो मिळत असे परंतुघराला घरपण देण्यासाठी त्याला आई नाही आणि पत्नी ही अशी. म्हणून त्याला सकाळ-संध्याकाळी पोटाची आग विझवण्यासाठी भाकर वाढ माईजो शिवाय पर्याय नव्हता.



संध्याकाळी साधारण गावाकडे दिवे लागण्याच्या वेळेपर्यंत आई- बहिणी शेतातील कामे आवरून स्वयंपाक करून ठेवतात. आणि उखर्डा पोटाचे आग विझवण्यासाठी बायको आणि मुलांसाठी घराच्या बाहेर पडतो.अंगात मळकी चळकी कुणीतरी दिलेली कपडे,पायात फाटकी चप्पल, एक दुरडी, लाकडी काठी आणि स्टीलचा किंवा जर्मरचा एक दोन डब्बा किंवा पातेलं सोबत घेऊन संध्याकाळी गावात मागायला निघतो. या वेळेस साधारण स्वयंपाक चालू असतो किंवा काही घरातील आटोपलेला असतो व तो दारोदारी येतो. दारासमोर उभे राहून मोठ्या आवाजात भाकर वाढ मायजो असे म्हणतो. प्रत्येक घरी भेटेलच याची शाश्वती नाही. काही महिला वर्ग पुढे हो भाकर झाली नाही अजून बोलतात. काही बाया अन माणसं तर एवढं बोलायची, दररोजचं झालंह्या मेल्याचं, हो पुढं ! म्हणून टाकून बोलायच्या. तो निराश न होता अपमान गिळून परत पुढच्या घरी जातो आणि भाकर वाढ माय जो म्हणून काही वेळ घरातून भाकर - तुकडा भाजी येईपर्यंत थांबतो. जो भाकर तुकडा दिला तो हातात घेतो आणि नमस्कार केल्यासारखं कपाळापर्यंत नेतो अन दुरडीत टाकतो.त्याला जणू अन्न हे पूर्णब्रह्म आहे याची जाणीव होते.कारण त्यासाठी हा भाकरीचा तुकडा परमेश्वर तुल्य होता. जणू त्या भाकरीच्या तुकड्यात परमेश्वराला शोधतो कारण हिच हा भाकरीचा तुकडा त्याची पत्नी लेकरं अन त्याच्या पोटाची आग विझवणारा असतो. अन त्यातूनच त्याची आत्मतृप्ती होणार असते म्हणून भाकरच त्याच्यासाठी देव होता. भाकरीचा कुणी चतकोर तर कोणी अर्धा तुकडा देत असे.ज्याच्या कडील भाजी तयार झाली असेल ते किंवा ज्यांचे जेवण होऊन भाजी उरली असेल तर फ कल्यापेक्षा भाजी देत असे. भाज्यांचा विषय असा कि प्रत्येकाच्या घरी बनवलेली भाजी वेगवेगळी असायची.एखादाच्या घरी पिठलं तर एखाद्याच्या घरी मेथी दाल तर काहींकडे चटणी ठेचा सुद्धा....!हे सर्व पंचपक्वान्न सर्व एकाच डब्यात टाकायचा. मग ती तयार व्हायची दर्जेदार झणझणित मिक्स व्हेज..! खरंच किती नशिबवान आहे न तो कि त्याला दररोज अशी झणंझणित दर्जेदार मिक्स व्हेज अन ताजी भाकर भेटते. हा झाला गंमतीचा भाग परंतु,ह्या दर्जेदार अन झणझणित मिक्स व्हेज साठी त्यालाकिती तरी आत्मसन्मान गहाण ठेवावा लागतो. शिव्या,तुसड्या भाषेतील बोलणं एकूण घ्यावं लागतं.त्याच दुःख त्यालाच ठाऊक...! तो हे सर्व सहन करतो टीचभर पोटासाठी अन त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या लेकरं बाळांसाठी..! तिकडे भुकेने व्याकुळ झालेले बायको पोरांचे चेहेरे त्याची आतुरतेने वाट पाहत असतात. अन हा रस्त्याने सर्व दुःखाचा मान अपमाना डोंगर डोक्यावर चालत असतो एका आशेने अन नव्या उम्मेदीन...! दरवाज्यात वाट बघत असलेलं लेकरू पायाजवळ येवून लोटांगन घालतं. बायकपोरासोबत तो जेवत नसतो तर आपल्याच नशिबाला अन कर्माला दोष देत पोटाची आग विझवत असतो...!

खरच किती संघर्ष असतो नं काहींच्या आयुष्यात !आपण सहज बोलून जातो कि त्याने असं करायलं हवं तसं करायलं हवं. परंतू प्रत्येकाचं दुःख हे वेगवेगळं असतं. कदाचित त्यालाही वाटत असेल कि बायकोनं कमवलेल्या थोड्याफार जमा पुंजीतून चटणी भाकर बनवावी अन स्वाभिमानाने खावी पण नाही...!पत्नीही नशिबात अशी काहीशी म तिमंद..! उलट तोच त्याच्यासाठी धडपडत असतो...! अशी ही दोघांची लग्नाची गाठबांधून ! काय रचना परमेश्वराची..!

असा हा नावाने जरी उखर्डा असला तरी कितीतरी पुण्याचं काम करून मान -अपमान गिळून बायको व लेकरू ह्या परमेश्वराच्याच लेकरांना अन्नपूर्णा, अन्नदाता म्हणून पोसतो. दररोज दारोदारी भिक मागतो व या भाकरीच्या तुकड्याला ब्रम्ह समजून कपाळाला लावतो. नव्या आशेनं मान-अपमान गिळून परत नव्या उम्मेदीनं पुढील घरी उभा ठाकतो,अन पोटतिडकीनं दारात उभा राहून घरातल्या मायला आवाज देतो, भाकर वाढ मायजो...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## विक्रमी वेडे..

कुणीही बनवे मुर्ख
पत्ते आहोत हुकमी
भरणारनाही हुंकार
करामनास जखमी

फसवूनि हातोहात
घाव घाल पार वर्मी
टार्गेटगरीबसामान्य
भुसभुशीत रे नरमी

कसे बनवले गाढव
फिदीफिदी बेशरमी
व्हाय्रल ते व्हिडिओ
हो क्रूरकर्मा बेरहमी

संताप उसळे मनात
बाहेर काढावी गर्मी
शांतते साहे अन्याय
भागव खुशाल गुर्मी

नेत्यांच्या कार्यक्रमी
सुसज्ज उभी आर्मी
घातपातअपघातात
डोळ्यांवर ये सुरमी

वेड्यात काढा जना
सामीलसर्वउपक्रमी
वेड्यांची इस्पितळे
संख्यावृध्दी विक्रमी

कुणी रे अतिशहाणे
बुध्दीची हो निलामी
कधी होणारं सजग
दणकाबसलाइनामी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

## सांगा, बाबासाहेबांना हेच अपेक्षित होते का?

दरवर्षी १४ एप्रिलला डॉ.बाबासाहेबांची जयंती आपण मोठ्या थाटामाटात साजरी करतो. भाषणातून, व्याख्यानातून व गायनातून बाबासाहेबांचे गोडवे गातो. बाबासाहेब भारतीय वंशाचे आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो. गाडीवर व बंगल्यावर मोठ्या आयटीने नाव जय भिम टाकतो. ६ डिसेंबरला चैत्यभूमीला जाऊन बाबासाहेबांना मनोभावे वंदना अर्पित करतो. बाबासाहेब भारतीय संविधानाचे निम र्ति आहेत, हे आम्ही लोकांना अभिमानाने सागतो. पण बाबासाहेबांना त्यांच्या स्वप्नातील नेमका भारत कसा अपेक्षित होता? आणि आपण सध्या काय करतो? याकडे मात्र आपण कानाडोळा करत आहोत. बाबासाहेबांना लहानपणापासूनच जातीयतेचे विखारी चटके सोसावे लागले होते.

त्यांना महार जातीचा असल्यामुळे वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागेल होते. त्यांना शुद्र म्हणून हिणवले जायचे.कोणी जेवणाच्या पंगतीला सुध्दा बसू देत नव्हते. सार्वजनिक ठिकाणी पानवठ्यावर बाबासाहेबांना पाणी प्यायची सुध्दा मुभा नव्हती. म्हणून बाबासाहेबांना जातीव्यवस्थेची व मनुवादी व्यवस्थेची प्रचंड चीड होती. म्हणून बाबासाहेबांनी अठरा-अठरा तास अहोरात्र अभ्यास व चिंतन करून जातीवादी व मनुवादी व्यवस्थेला मोडीत काढून सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या पवित्र अशा भारतीय संविधानाची निर्मिती करून मागासवर्गीयांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणला. तेव्हा कुठे आज आपल्याला सुखाचे, आनंदाचे व सन्मानाचे जीवन जगायला मिळाले. आज आपण बाबासाहेबांच्या संविधानामुळे मोठमोठ्या पदावर विराजमान होत आहोत. कोणी कलेक्टर होत आहे, कोणी डॉक्टर होत आहे तर कोणी इंजिनिअर होत आहे. एवढेच नाही तर या देशाची राष्ट्रपती एका सर्वसामान्य कुटुंबातील महिला होत आहे. ही पुण्याई फक्त आणि फक्त माझ्या बाबासाहेबांची आहे. एवढे नाही तर दलितांच्या व मागासवर्गीयांच्या जीवनातील काळोख दूर सारून, त्यांना प्रकाशमान करण्याचे महत्वपूर्ण काम बाबासाहेबांनी केले आहे, म्हणजे कधीही न फिटणारे महान असे उपकार बाबासाहेबांनी आपल्यावर करून ठेवले आहेत. म्हणून बाबासाहेबांना आम्ही जग बदलवणारा बाप माणूस मानतो, आणि त्यांची जयंती भारतासह जवळपास १५६ देशांत आम्ही साजरी करतो.

पण बाबासाहेबांच्या स्वप्नातील अपेक्षित जयंती आपण खरंच साजरी करतो का? बाबासाहेबांना त्यांच्या स्वप्नातील भारत कसा हवा होता? आणि आपण खरंच त्या दिशेने वाटचाल करतो का? तर निश्चितच नाही असे म्हणावे लागेल. कारण बाबासाहेबांच्या जयंतीत आज सगळा धांगडधिंगा चालू आहे. दारू पिऊन व डॉल्बी लावून आमची युवा पिढी बाबासाहेबांच्या तैलचित्रापुढे सगळा नंगानाच करत आहे.काहीजण तर बाबासाहेबांच्या जयंतीत पूर्ववैमनस्यातून वाद-विवाद करत आहेत आणि जयंतीला गालबोट लावत आहेत. ही आपल्या भारतीयांसाठी अतिशय चिंताजनक बाब म्हणावी लागेल. दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे, बाबासाहेबांना आपण डोक्यात न घेता, थेट डोक्यावर घेऊन नाचत आहोत. कारण बाबासाहेब सुध्दा एका भाषणात म्हणाले होते की, माझ्या नावाचा जयजयकार करण्यापेक्षा, मी सांगितलेली कामे आदी प्राणपणाने करा.हेच बाबासाहेबांना अभिप्रेत होते. कारण आता तसे होताना दिसत नाही, बाबासाहेबांची चळवळ, आणि त्यांचा अजेंडा बाजूला सारून आपण त्यांच्या नावाचा नुसता गवगवा करत आहोत.

हे बाबासाहेबांना कदापी मान्य नव्हते. ज्यादिवशी आपण बाबासाहेबांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा डोक्यात घेऊन वाचाल, त्या दिवशी बाबासाहेबांच्या स्वप्नातील खरी जयंती साकार झाली असे म्हणता येईल. त्यासाठी आपल्याला आंबेडकर जयंतीचे स्वरूप बदलावेच लागेल. त्यासाठी आपण येणाऱ्या १३४ व्या जयंती निमित्त असा निर्धार करूया की, आता इथून पुढे आम्ही जयंतीत कसलाच डिजे लावणार नाही व त्याच्यापुढे दारू पिऊन नाचणार नाही तर जयंती दिनी आम्ही बाबासाहेबांना अठरा तास वाचन करून अभिवादन करणार आणि बाबासाहेबांचे राहिलेले अपुरे काम पूर्णत्वास नेणार! म्हणजे खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या स्वप्नातील अपेक्षित जयंती साजरी झाली, असे म्हणता येईल....

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खंडाळी, ता.अहमदपूर जिल्हा लातुर**
**मो.७४९८७१५६६१.**

## महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने केली एका वर्षात केली ४१२ कोटीची वसुली

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, पनवेल :** महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४१२ कोटींची वसुली केली असून हा आजवरील सर्वाधिक वसुलीचा विक्रम आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने गेले वर्षभर नियोजनबध्द पध्दतीने रूपरेषा आखून वसूलीचा हा विक्रम केला आहे. मालमत्ताकर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नियंत्रणाखाली योग्य उपाययोजना राबवत एकुण ४१२ कोटी इतका महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. गेल्या महिनाभरात मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे व कर अधिक्षक महेश गायकवाड व सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली चारही प्रभागामंध्ये मार्च महिना संपेपर्यंत कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कोणतीही सुट्टी न घेता शनिवार, रविवारी देखील कार्यालये सुरू ठेवली. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व्यवसायिक मालमत्ता करधारकांडून पालिकेने वसुलीची थेट कारवाई सुरु केली. वसुलीसाठी महापालिकेच्या वतीने यावेळी १३ पथके तयार केली होती. प्रभाग अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके सर्व प्रभागांमध्ये वसुलीसाठी जात होती. विकास कामे करण्यासाठी महापालिकेकडे मालम त्ता कर हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असल्याकारणाने वेळोवेळी सावध पाऊले उचलली. पनवेल महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून महानगरपालिकेने सिडको हस्तांतरीत भाग, पनवेल औद्योगिक वसाहत, मार्बल मार्केट, जवाहर औद्योगिक वसाहत, तळोजा औद्योगिक वसाहत, अशा भागांमध्ये व्यवसायिक व औद्योगिक मालमत्ता करधारकांडून वसुलीची थेट कारवाई सुरु केली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ४.४३ कोटींचा नफा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** सोमवार दिनांक ३१ मार्च २०२५ पारनेर ग्रामीण पतसंस्थेला सन. २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात रुपये ४ कोटी ४३ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. संस्थेच्या मार्च २०२५ अखेर २०९ कोटी ८४ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे खेळते भांडवल रु. २४७ कोटी २२ लाख आहे. वसूल भाग भांडवल रु. ६ कोटी १० लाख राखीव व इतर निधी रु. २६ कोटी २८ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप रु. १४८ कोटी ९८ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये ७९ कोटी ९६ लाख आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये २२१७ कोटींची झालेली आहे. संस्थेचे व्हाईस चेअरमन सुरेश बो-हुडे सर यांनी सांगितले की संस्थेने २२ वर्षाच्या कालावधीत सभासदांच्या विश्वासावर प्रगती केलेली असून सभासदांना घर बांधणी, व्यवसाय, स्थावर मालमत्ता खरेदीसाठी, वाहन खरेदी तसेच गोरगरीब गरजू घटक, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, लघुउद्योग, होतकरू कामगार यांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती करता यावी यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संस्थेच्या १७ शाखा कार्यरत !**

संस्थेने २२ वर्षाच्या कालावधीत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे (नवी मुंबई), खडकवाडी, आळेफाटा, सुपा व शिरूर येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अद्यावत इमारती आहेत. पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा ता. जुन्नर, सुपा, कामोठे (नवी मुंबई), वनकुटे, अहिल्यानगर, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई जिल्हा आहे. संस्थेमार्फत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी व जामगाव, ढवळपुरी व बेलवंडी फाटा येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थेच्या अद्यावत कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग, चेक क्लिअरींग सुविधा, एसएमएस सुविधांमुळे ग्राहकांना सर्व माहिती तात्काल मिळत आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधिकृत वीज बिल भरणा केंद्र, आरटीजीएस व एनईएफटी सुविधा सुरू करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांनी सांगितले.

## डहाणूत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना अंतर्गत वॉटरशेड यात्रा




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०१, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (पाणलोट विकास घटक २.०) अंतर्गत वॉटरशेड यात्रा डहाणू तालुक्यातील मौजे गोवणे येथे आयोजित करण्यात आली. या यात्रेचा मुख्य उद्देश लोकसहभागातून मृद व जल संधारणाची जनजागृती करणे आणि त्याद्वारे विकास साधणे हा होता.कार्यक्रमानंतर शेतकऱ्यांच्या शेतीवर जाऊन बांधलेल्या शेततळ्यांची पाहणी करण्यात आली. या पाहणीद्वारे जलसंधारणाच्या प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ किती मिळतो आहे, याचा आढावा घेण्यात आला.

या यात्रेमुळे डहाणू तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये जलसंधारणाबद्दल जागरूकता निर्माण होईल आणि शेतीसाठी अधिक चांगल्या सुविधा मिळवण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाला आमदार राजेंद्र गावित यांचे सुपुत्र रोहित गावित, प्रमुख पाहुणे अँड. निलेश राऊत, युवा एल्गार आघाडी अध्यक्ष अँड. विराज गडग, गोवणे गाव सरपंच अलका घोडा, उपसरपंच संदीप ठाकरे, ग्रामसेविका रजनी शेलार, डेहणे सरपंच दत्तात्रय भोंडवा, ग्रामपंचायत सदस्य सचिन कोम, दशरथ गहला, सुदाम मेरे, हेमेंद्र पाटील, बारक्या वायेडा, महादू तांबडा तसेच कृषि विभागाचे मंडळ कृषि अधिकारी उमेश पवार, जगदीश पाटील, सर्व कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, ग्रामस्थ आणि महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रस्त्यांच्या कामांसंदर्भात उच्चस्तरीय बैठक खा.नीलेश लंके यांनी घेतला आढावा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघात निवडणूकीदरम्यान दिलेल्या विकास कामांची पुर्तता करण्यासाठी विविध भागांतील रस्ते आणि महामार्गांच्या कामांना गती देण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत खा. नीलेश लंके यांनी विविध कामांचा आढावा घेतला. नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, तांत्रीक तज्ञ, अभियंते आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत छत्रपती संभाजीनगर-पुणे ग्रीन फिल्ड महामार्ग, सुरत-चेन्नई महामार्ग, पैठण पालखी मार्ग आणि इतर महत्वाच्या रस्ते प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पांमध्ये येणाऱ्या अडचणी, निधी वितरण, विविध प्रकारच्या परवाणग्या, तांत्रीक बाबी आणि जमीनींचे अधिग्रहण याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. कामांमध्ये येणारे अडथळे दुर करून कामांना गती देण्यासाठी अधिकाऱ्यांना खा. लंके यांनी यावेळी ठोस सुचना दिल्या. बैठकीस मा. नगरसेवक दीप चव्हाण, योगीराज गाडे, गिरीश जाधव, प्रकाश पोटे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक वसंत पंधेकर, साईट इंजिनिअर ओंकार देवकर, कार्यकारी अभियंता शेवाळे, सर्व्हेअर मुजीफ सययद, महेश मिश्रा, निवासी अभियंता अलोक सिंग, शाखा अभियंता शोएब फकीर, उपविभागीय अभियंता अजित गायके, घटमल, राखाडे व इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**महत्वाच्या प्रकल्पांवर चर्चा !**

राहुरी-बारगांव नांदूर- जांभळी -वावरथ-भोकरदरा-ढवळपुरी हा नगर-कल्याण महामार्गाला जोडणारा रस्ता, राहुरी येथे बायपास अथवा फलाय ओव्हर ब्रीज उभारणी, नगर शहरातील पत्रकार चौक ते सहयाद्री चौकादरम्यान फ्लाय ओव्हर ब्रीज, आढळगांव ता.श्रीगोंदा येथे रेल्वे ओव्हरब्रीज आदी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. पैठण - मोहरी - खर्डा या ५५ कि.मी. लांबीच्या पालखी मार्गाचे काम वारकऱ्यांसह शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने हे काम गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी खासदार निलेश लंके यांनी दिले.

## गोळी झाडून खून करणाऱ्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांकडून अटक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३१, पनवेल :** शहर पोलीस ठाणे पनवेल येथे तक्रारदार शिवाजी चन्सी भदरगे, बांधकाम मिस्त्री, रा. पारगांव, पनवेल, यांनी दि.२६ मार्च २०२५ रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, दिनांक २६/०३/२०२५ रोजी १६.३० वा. च्या सुमारास गराडा गावाजवळील मोकळ्या जागेमध्ये नवीन घराचे बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणाने बाबुराव वाघमारे, वय अंदाजे ४७ वर्षे यांना बंदुकीने गोळी मारून त्यांचा खून केला आहे. म्हणून पनवेल शहर पोलीस ठाणे येथे १४७/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम १०३(१) सह भारतीय हत्यार कायदा १९७९ चे कलम ३, २७ प्रमाणे दि. २६/०३/२०२५ रोजी २२:४२ वा. गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ०२, पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली व सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांचे परिवेक्षणाखाली ०४ वेगवेगळे पोलीस पथके तयार करून गुन्ह्यातील आरोपीचा शोध चालु केला. नमूद गुन्ह्यात पथकांनी घटनास्थळी आजु बाजुच्या परिसरात वास्तव्यास असणारे लोकांकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने बारकाईने चौकशी केली असता मयताचा खुन प्रभाकर उर्फ चिल्या याने केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

तपास चालु असताना पोलीस मुख्यालातील नियुक्तीचे पोलीस हवालदार दिपक कदम यांच्याकडून पनवेल शहर पोलीस ठाणे कडील सपोउपनि/ मंगेश कदम यांना तसेच बातमीदाराकडून पनवेल शहर पोलीस ठाणे कडील पोहवा/ २०६८ म्हात्रे यांना आरोपी हा खालापूर येथील अदिवासी वाडीवर लपून बसला असल्याची माहिती मिळाल्यानंतर तपास पथक खालापूर येथे रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी स्थानिक पोलीस अंमलदारांच्या मदतीने कोणतीही तांत्रिक माहिती नसताना आरोपी प्रभाकर जनार्दन वाघे उर्फ चिल्या, वय २७ वर्षे, धंदा बेकार, रा. कोली कोपर, ता. पनवेल, जि. रायगड यास ताब्यात घेऊन अटक



करण्यात आली. सदर आरोपीने गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. सदर आरोपीचे गुन्ह्यातील साक्षीदार सोबत चालू असलेले भांडणात मयत बाबुराव वाघमारे हे भांडण सोडविण्यास गेले असताना त्याचा राग येऊन आरोपीने बंदुकीची गोळी झाडून मयतास जिवे ठार मारल्याचे आतापर्यंताचे तपासात निष् आहे. अटक आरोपीस प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले असता आरोपीला दि. ०३ एप्रिल २०२७ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाली असुन गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे करीत आहेत.

सदरची कार्यवाही नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ ०२) प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त (पनवेल विभाग) अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल यांच्या आदेशान्वये पनवेल शहर पोलीस ठाणे कडील सपोनि/प्रकाश पवार, पोउपनि/ विनोद लभडे, पोउपनि/हर्षल राजपूत (पनवेल तालुका पो. ठाणे), स.पोउपनि/ मंगेश कदम, पोहवा/ दिपक कदम (पोलीस मुख्यालय, नवी मुंबई), पोहवा/ ३०२६ यशवंत झाझम, पोहवा/ १३७८ अविनाश गंथडे, पोहवा/ ९३४ नितीन वाघमारे, पोहवा ९९ महेश पाटील, पोहवा/ १६२० अमोल होईफोडे, पोहवा/ २०६८ परेश म्हात्रे, पोहवा/ १८७१ महेंद्र वायकर, पोहवा/ २२२८ अमोल पाटील, पोहवा/२३२६ संदेश म्हात्रे, पोना/ ३२९४ मिथुन भोसले, पोशि/ ३७३३ विशाल दुथे, पोशि/३७२७ चंद्रशेखर चौधरी व पोशि/ ४०३३ किरण कराड यांनी केली आहे.

## पाटण तालुक्यात महसूल विभागाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाला दमदार सुरुवात

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०१, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र शासनाने सर्व विभागामार्फत राज्यामध्ये नागरिक, जनता यांची कामे वेळेत व जलद होऊन त्यांचे आयुष्य सुकर होण्यासाठी १०० दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. त्यानुसार पाटणच्या महसूल विभागामार्फत नागरिक, शेतकरी यांच्या हक्काचे लाभ त्यांना जलद देणेसाठी नियोजन करून कार्यवाही केली आहे. यानिमित्ताने पाटण तालुक्यात महसूल विभागाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाला प्रांताधिकारी सोपान टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली दमदार सुरुवात झाली आहे. असे तहसिलदार अनंत गुरव यांनी सांगितले.

पाटण तालुक्यात १ लाख ५७ हजार ५५१ शेतकरी आहेत. शेतकरी यांची ७/१२ विषयक कामे यामध्ये प्राधान्याने घेणेत आली आहेत. वारस नोंदी, ए. कू. मॅ., नोंदी, अपाक नोंदी, तुकडा नोंदी कमी करणे, लक्ष्मी मुक्ती योजना, पाणंद व शेत रस्ते अतिक्रमण मुक्त करणे या कामाच्या माध्यमातून शेतकरी यांचे कामे पूर्ण करून त्यांना दिलासा दिला जात आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या साठी सुरु असलेली सामाजिक अर्थ साहाय्य योजना अंतर्गत विधवा, वृद्ध, निराधार, दिव्यांग बांधव यांचेप्रस्ताव मंजुरी करून त्यांच्या आयुष्याला आर्थिक हातभार लावून त्याचे जीवनमान उंचावणे. विध्यार्थी यांना शाळा व नोकरीसाठी लागणारे दाखले वाटप करणे असे सर्व घटकांना समविष्ठ करून १०० दिवसीय कार्यक्रम मध्ये नागरिकांना लाभ मंजूर करनेत आले आहेत. या १०० दिवसीय कार्यक्रमात वारसा नोंदी मंजुर संख्या- ८३८, सातबारा संख्या - ६९०३, लाभार्थी संख्या- २८२९, तुकडा नोंद कमी गट संख्या- १३७७०, लाभार्थी शेतकरी संख्या- ५४,३५०, ए. कू. मॅ. नोंद कमी संख्या- ४५९, लाभार्थी शेतकरी संख्या- १९२५, लक्ष्मी मुक्ती योजना संख्या- ४५ महिलांची नावे सातबारा ला लावली, अपाक नोंद संख्या- ५२९, लाभार्थी संख्या- ५२९, पाणंदअतिक्रमण मुक्त करणे-

पाणंद संख्या- २३, शेतकरी लाभार्थी- २१४६, सामाजिक अर्थ साहाय्य योजना (संजय गांधी योजना) मंजूर प्रकरणे - ३२३, पी.एम. किसान लँड सीडींग लाभार्थी संख्या- ३८४, पुनर्वसन गावठाण प्लॉट वर्ग १ करणे लाभार्थी - २५७, अग्रीस्टॅग फार्मर आयडी संख्या- ५१३९०, भूकंप ग्रस्त दाखले संख्या - ५९

सदर कार्यक्रम यशस्वी करणे साठी तहसील कार्यालय मधील सर्व अधिकारी, कर्मचारी, विशेषत: मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक यांनी खूप परिश्रम घेतले. यापुढे ही जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपजिल्हाधिकारी विक्रांत चव्हाण, नागेश पाटील, उपविभागीय अधिकारी सोपान टोम्पे यांचे मार्गदर्शनाखाली प्रलंबित कामे पूर्ण केली जाणार आहेत.

**विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दाखल्यांसाठी अशीच तत्परता हवी- लक्ष्मण चव्हाण**

महाराष्ट्र शासनाने महसूल विभागाकडून सुलभता मिळावी व नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी १०० दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याच पद्धतीने विद्यार्थांना त्यांच्या शैक्षणिक दाखल्यांच्या कामात सुलभता व सुकरता यावी. यासाठी पाटण महसूल विभागाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक अथवा नोकरीच्या कामासाठी त्यांचे जातीचे दाखले, भुकंपग्रस्त दाखले, अल्पभूधारक दाखले आदी दाखले वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. अलिकडे अनेक दाखल्यांवर नियमबाह्य त्रुटी काढण्याचे प्रमाण वाढले आहे. संबंधित महसूल कर्मचारी, अधिकारी यांच्यासमोर दाखल्यांची प्रकरणे अनेक दिवस पडून असतात. यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर दाखले मिळत नाहीत. यासंदर्भात संबंधितांना विचारले असता आमच्या पुढे ऐवढेच काम नाही असे उद्धट पणाने सांगितले जाते. हे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांना प्राधान्य देवून त्यांचे दाखले वेळेत व पहिल्यासारखे सुलभतेने द्यावेत ही अपेक्षा पाटण च्या महसूल विभागाकडे आहे. असे सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण चव्हाण यांनी सांगितले.

## माळकूप येथे वसले प्रती अक्कलकोट - दिलीप दाते

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०१, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील हजारो स्वामी भक्तांचे श्रद्धास्थान असलेले माळकुप येथील श्री स्वामी समर्थ महाराज स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त काल पारनेर तालुक्यातून हजारो स्वामी भक्तांनी स्वामी सेवेचा लाभ घेतला पहाटे स्वामींचा महाअभिषेक झाला. सकाळी आरती झाली, सायंकाळी महाप्रसादाचा लाभ घेतला त्यावेळेस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पारनेर तालुक्याचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांचे चिरंजीव युवा उद्योजक दिलीप दाते यांनी काल श्री स्वामी समर्थ देवस्थान येथे आले असता स्वामींचे मनोभावे दर्शन घेतले व दिलीप दाते यांनी सांगितले माळकूपच्या माळरानावर वसले प्रति अक्कलकोट दिलीप दाते यांनी स्वामी भक्तांशी संवाद साधला व स्वामी सेवेचा लाभ घेतला. त्यावेळेस पारनेर तालुक्यातून हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार साहेब यांच्या हस्ते आरती झाली. स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त भाळवणी येथील विजय कुलथे यांचे स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त महाप्रसाद ठेवलेला होता. स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष आर. एस कापसे सर यांच्याकडे श्री स्वामी समर्थ देवस्थानच्या वतीने स्वामींच्या दरबारापुढे सभा मंडपाची मागणी केली. त्यावेळेस बोलताना आर. एस. कापसे म्हणाले. आमदार काशिनाथ दाते सर यांच्याकडे मी पाठपुरावा करीन.

स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त रात्री आकर्षक अशी विद्युत रोषणाई केली होती. स्वामींच्या दरबारात आकर्षक असे सागर शिंदे यांनी डेकोरेशन केले होते.

स्वामींच्या प्रकट दिनानिमित् दिलीप दाते, गोरख दाते, राष्ट्रवादी काँग्रेस



पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष आर.एस.कापसे सर,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, युवक तालुका अध्यक्ष शिवराज कदम, सुषमा रावडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला तालुकाध्यक्ष, डॉक्टर श्रीकांत पठारे शिवसेना (उ.बा.ठा) गट या सर्वांनी काल स्वामींचे मनोभावे मार्गदर्शन घेतले,

भाळवणी येथील स्वामी सेवेकरी नागेश चेमटे अनेक दिवसांपासून श्री स्वामी समर्थ देवस्थान माळकूप येथे स्वामींच्या सेवेसाठी मंदिरासाठी झटत आहे सर्व स्वामी भक्तांना सोबत घेऊन अनेक युवा वर्गाला स्वामी सेवेला लावले आहे.

त्यावेळेस स्वामी समर्थ देवस्थान येथील मारुती शिंदे, राजेंद्र शिंदे, गणेश शिंदे, योगेश शिंदे, निलेश शिंदे, सुमित रोहोकले, दिपक रोहोकले, चेतन कुंभकर्ण, योगेश कुंभकर्ण, पत्रकार शिवशंकर शिंदे, गंगाधर नाबगे, विजय नाबगे, हरीभाऊ कदम, ऋषिकेश नाबगे, वैष्णव लवांडे, शरद शिंदे, डॉक्टर संजय नाबगे, जयसिंग नाबगे, सुधीर गवळी, राहुल नाबगे, ओम काळे या सर्वांनी स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त खूप कष्ट घेतले.

## नवी मुंबई महानगरपालिकेने उभारली ८०० कोटींच्या मालमात्ताकर वसुलीचे उद्दिष्ट गाठणारी गुढी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर बेलापूर येथील नवी मुंबई महानगरपालिकेत मालमत्ताकर विभागाच्या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी ८०० कोटींच्या कर वसुलीचे उद्दिष्ट गाठण्याच्या संकल्पाची गुढी उभारली. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या शेवटी २९, ३० व ३१ मार्च रोजी गुढीपाडवा व ईद अशा शासकीय सुट्ट्या आल्या होत्या, तथापि सदर दिवशी मालमत्ताकर विभागातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी जोमाने काम करून मालमत्ताकराच्या वसुलीसाठी प्राधान्य देऊन वसुलीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी मालमत्ताकर विभागातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत मालमत्ताकर भरावा यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने निरनिराळे उपक्रम राबविले. १० मार्च २०२५ पासून थकीत मालमत्ताकरावरील शास्ती रकमेवर ५० टक्क्यांची सूट देणारी 'अभय' योजना जाहीर केली. नागरिकांना ऑनलाईन मालमत्ताकर भरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नवीन ऑनलाईन मालमत्ताकर संकलन प्रणाली सुरू केली. कर थकबाकी करणाऱ्या मालमत्ताधारकांना नोटीसा देणे, नळ कनेक्शन बंद करणे, कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांच्या घराबाहेर ढोलताशे वाजून त्यांना कर भरण्यासाठी जागे करणे, विविध समाज माध्यमांच्या उपयोगातून मालमत्ताकर भरण्यासाठी जागृती करणे, प्रसार माध्यमांतून करभरणा करण्याच्या जाहिराती करणे अशा प्रमुख उपक्रमांचा त्यात समावेश होता. नागरिकांसाठी सुट्ट्यांच्या दिवशी विशेष करभरणा केंद्रे (कॅश काउंटर्स) सुरू ठेवण्यात आले. सुट्ट्यांच्या दिवशीही मालमत्ताकर विभागाच्या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी कर्तव्याला महत्त्व देत करवसुलीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

# नारायणगावच्या तमाशा पंढरीत बुकिंगसाठी हाऊसफुल्ल गर्दी

## यंदाच्या वर्षी तमाशाला सुगीचे दिवस

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** पाडव्याच्या मुहूर्तावर नारायणगावच्या तमाशा पंढरीमध्ये जवळपास सर्वच तमाशांचे बुकिंग फुल्ल झालेले पाहायला मिळाले. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुमारे दीड कोटी रुपयांची उलाढाल रविवार, दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी झाल्याची माहिती फडमालकांनी दिली. सुमारे १५० हून अधिक करार झाले असावेत, असा अंदाज या वेळी व्यक्त करण्यात आला. फेब्रुवारीपासून पाडव्यापर्यंत तब्बल ८०० करार झाले असून एकूण उलाढाल ५ कोटी रुपयांपर्यंत झाली. दरवर्षीपेक्षा यावर्षी पाडव्याच्या दिवशी नारायणगाव येथे बुकिंगसाठी गर्दी दिसून आली.

पाडव्याच्या दिवशी तारखा खाली नसल्याने अनेकांनी काही दिवस आगोदर येऊन तमाशाच्या तारखा बुक झाल्याचे आढळून आले. नारायणगाव या तमाशा पंढरीत फेब्रुवारीच्या दुसर्या आठवड्यापासून महाराष्ट्रातील विविध फड मालकांच्या राहुट्या लागत असतात.

यंदाच्या वर्षी ३५ फड मालकांनी आपली कार्यालये या ठिकाणी थाटली आहेत. मागील वर्षी निवडणुकीचा माहोल असल्यामुळे तमाशाच्या फड मालकांना काही प्रमाणामध्ये आर्थिक फटका बसला होता. त्यामुळे फारशी उलाढाल त्यावर्षी झाली नाही.

यंदा मात्र तमाशा बारीला चांगले दिवस असल्याचे पाहायला मिळत आहे. तमाशाचा फड लहान असो अथवा मोठा पाडव्याच्या दिवशी सगळ्याच फड मालकांच्या तारखा फुल्ल झाल्याच्या पाहायला मिळाल्या. अनेक यात्रेकरूंना आपल्या यात्रेची तारीख फड मालकाकडे खाली नसल्यामुळे हात हलवत परत जावे लागले.

अथवा छोट्या फड मालकाच्या खेळावर समाधान मानावे लागले. पाडव्याच्या अगोदर अनेकांनी सुपार्या दिल्या असल्या तरी पाडव्याच्या दिवशी देखील अनेक जिल्ह्यांमधून तमाशाप्रेमी या ठिकाणी तमाशा बारी बुकिंगसाठी आल्याचे पहायला मिळाले.

पारनेर, अहमदनगर, संगमनेर, अकोले, आंबेगाव, खेड, शिरूर, बीड, जालना, सातारा, जळगाव, धुळे, चाळीसगाव, श्रीगोंदा या भागातून देखील तमाशा प्रेमी या ठिकाणी गावच्या यात्रेनिमित्त तमाशा ठरवायला आल्याचे पहायला मिळाले. गुढीपाडव्याच्या आधीच नामांकित तमाशाचे बुकिंग नारायणगावच्या या तमाशा पंढरीमध्ये पाडव्याच्या दिवशी तमाशाचा खेळ ठरवायला राज्यामधून मोठ्या प्रमाणात तमाशा शौकीन येत असतात.

एकाच दिवशी जास्त गावचे लोक या ठिकाणी बुकिंगला येत असल्यामुळे चांगल्या नामांकित फडमालकांच्या तारखा मिळण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अनेक गावकऱ्यांनी गुढीपाडव्याच्या दिवशी या ठिकाणी न येता अगोदरच येऊन नामांकित फडमालकांना सुपाऱ्या (करार) देऊन आपल्या यात्रांचे नियोजन केले आहे.



यंदाच्या वर्षी तमाशाला सुगीचे दिवस महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील तमाशा ही जिवंत लोककला जतन करण्याचे काम प्रामुख्याने खेड्यातील यात्राप्रेमी करत असतात तमाशात महिलांची संख्या जास्त असेल तर त्या तमाशाला मागणी राहते. तमाशाच्या माध्यमातून समाज प्रबोधन होते. गावच्या यात्रेमध्ये तमाशाचा मनमुराद आनंद मिळावा, यासाठी गण- गवळण, बतावणी, हजेरी,फारसा असे कार्यक्रम तमाशा फडमालक ठेवत असतो. लहान - मोठ्या सगळ्याच तमाशाच्या बाऱ्या पाडव्याच्या दिवशी फुल्ल झाल्या आहेत. बहुतांश तमाशाचे बुकिंग या अगोदरच झालेले आहेत. साधारण २०० हून अधिक करार पाडव्याच्या मुहूर्तावर झाले.

**- किरणकुमार ढवळपूरीकर, मालक,**
**चंद्रकांत ढवळपूरीकर तमाशा मंडळ**

# शोशल मीडियावर सध्या धुमाकूळ घालत आहे तेजू आणि वेदूचे व्हिडीओ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयामध्ये इयत्ता पाचवीत शिकणारी वेदिका चव्हाण व इयत्ता सातवीत शिकणारी तेजस्विनी चव्हाण या दोन्ही सख्ख्या बहिणींनी बनवलेले व्हिडिओ सध्या सोशल मीडिया वरती धुमाकूळ घालत आहेत. या विद्यार्थिनींनी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन, भरपूर बक्षीस मिळवली आहेत.

सोशल मीडियावर या दोन्ही भगिनी तेजू आणि वेदु या नावाने प्रसिद्ध आहेत. 'अनन्या अनन्या सावध हो जरा', या गाण्याचा तेजू आणि वेदू या दोन्ही बहिणींनी बनवलेला व्हिडिओ सध्या इंस्टाग्राम वर धूमाकूळ घालतोय,



जवळपास १ लाख ६५ हजार इंस्टाग्राम धारकांनी या व्हिडिओला लाईक केले आहे. तर ५ लाख पेक्षा जास्त लोकांनी हा व्हिडिओ पाहिला आहे. लहान वयातच अभ्यासाबरोबरच सोशल मीडियावर आपली वेगळी छाप निर्माण करणाऱ्या या दोन्ही बहिणी. मूळचे सातारा जिल्ह्यातील फलटण येथील असून सुनील चव्हाण हे मसाला व्यवसायानिमित्त कोविड काळापासून विंचूर येथे स्थायिक झाले. त्यांचे वडील नाशिक जिल्ह्यात मसाला विक्रीचा व्यवसाय करीत होते. त्यांची पत्नी अश्विनी यांची त्यांना भक्कम साथ आहे. दारोदारी घरपोच कच्चा मसाला विक्रीचे काम ते करत असतात. दोघीही अभ्यासात हुशार, आठवड्यातून पाच दिवस सातत्याने अभ्यास आणि फक्त शनिवार व रविवार चांगले व्हिडिओ बनविण्याचा त्यांचा छंद आज इंस्टाग्राम वर मोठ्या प्रमाणात धूम करतो आहे. आजोबा जयसिंग चव्हाण यांना गायन वादनाची आवड असल्याने त्यांचे कलापथक होते. त्यामुळे घरात गायन वादनाची आवड निर्माण झालेल्या, तेजू- वेदू या वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्या आहेत.

इंस्टाग्राम या सोशल मीडिया अकाउंट वर ९१२ पोस्ट त्यांनी आतापर्यंत केले असून, लाखोंच्या घरात त्यांचे चाहते त्यांना फॉलो करून अत्यंत कमी वयात त्यांना डोक्यावर घेत आहेत. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असलेल्या तेजू आणि वेदू यांच्या दोन महिन्यापूर्वी बनविलेल्या अनन्या व्हिडिओला १ लाख ६५ हजार पेक्षा जास्त लोकांनी फॉलो केले आहे.

रिल्स, व्हिडिओच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात प्रसिद्ध झालेल्या तेजू ला भविष्यात ब्युटी पार्लर आणि वेदू डॉक्टर होण्याची तीव्र इच्छा आहे. मात्र घरची परिस्थिती बेताची असल्याने त्यांचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सोशल मीडियाची भविष्यात मदत निश्चित मिळेल अशी आशा त्यांना आहे.

# कल्याणमध्ये ग्लोबल खान्देश महोत्सव - २०२५ ची सांगता

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.३१, शहापूर (ठाणे) :** ऊत्तर महाराष्ट्रातील रहिवाशांतर्फे दरवर्षी कल्याण मधे खान्देश महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील दिनांक २८ ते ३१ मार्च २०२५ रोजी या कालावधीत आत्माराम भोईर चौक, उंबर्डे गांव रोड, सेंट लॉरेन्स हायस्कुल समोर, कल्याण (प) संपन्न झाला. ग्लोबल खान्देश महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी दशकपूर्ती महोत्सवाचं उद्घाटन माजी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिलजी पाटील यांच्या शुभहस्ते हस्ते झाले. तर समारोपाला महसूल मंत्री बावनकुळे त्याचबरोबर कल्याण पूर्व च्या आमदार सुलभा गायकवाड यांनी उपस्थित राहून खान्देशातील संस्कृतीचे तोंड भरून कौतुक केले.

यावेळी तरुणाईसाठी मनोरंजनाचं, खवैय्यांसाठी खाद्य पदार्थांचं, महिलांसाठी खरेदी विक्रीचं अनेक दालने सजली होती. विविध आणि नावीन्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमांची जणू रेलचेलच होती. बहारदार संगीत, शानदार नृत्य, दमदार गायन आणि जानदार वादन यांचा सुरेख संगम याचा आस्वाद रसिक प्रेक्षकांना अनुभव घेतला. प्रमुख अतिथी म्हणून कोकण पदवीधर मतदार संघाचे लाडके व लोकप्रिय आमदार



निरंजन डावखरे यांनीही मनोगत व्यक्त करताना उत्तर महाराष्ट्र खान्देश विकास मंडळ आणि टीमचे कौतुक आणि अभिनंदन केले. आमदार नरेंद्र पवार हे खान्देशचे जावई असल्यामुळे खान्देशी पदार्थांची चव मला घरातच चाखायला मिळते. त्यामुळे मी घरी आलेल्या पाहुण्यांसाठी खान्देशी जेवण बनवावं म्हणून आग्रही असतो असं सुतोवाच केलं. नगरसेवक प्रभूनाथ भोईर, नगरसेवक वरुण पाटील, मा.नगरसेवक जयवंत भोईर इ.मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. ३५ हून अधिक देशातील खान्देशी बांधव रसिक प्रेक्षक म्हणून आनंद व आस्वाद घेतला. नृत्य कला दिग्दर्शक तथा कोरिओग्राफर आशिष पाटील यांचा दमदार आणि कसदार परफॉर्मन्स कल्याणकरांसाठी मनोरंजनाची, कलेची एक नेत्रसुखद मेजवानीच होती. त्याचप्रमाणे बाल सेलिब्रेटी कु.आराध्या दीप्ती योगेंद्र पाटील झी मराठी शिवा मालिका, प्रेमास रंग यावे, गाथा नवनाथाची आणि तुझी माझी जोडी जमली या मालिका मध्ये आपल्या अभिनय कौशल्याची चुणूक दाखविणारी बाल कलाकार म्हणून महोत्सवाचे आकर्षक बिंदू ठरली. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी नगरसेवक सुनील वायले यांची उपस्थिती लावली. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी खान्देशी संस्कृतीचं, खाद्य पदार्थांचं, खान्देशी माणसाचं मनापासून कौतुक केले. त्याच बरोबर हिंदकेसरी सुवर्णपदक विजेते श्री पैलवान युवराज वाघ यांना खान्देश भूषण तर पद्मश्री श्री चैत्राम पवार यांना खान्देश रत्न व भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर बी.एन.पाटील, विजय महाजन, सचिव महाराष्ट्र राज्य हेमराज बागुल, नृत्यकार आशिष पाटील, त्याचबरोबर कोकीलाबेन हॉस्पिटलचे व्हाईस प्रेसिडेंट रामचंद्र भिवसने यांना खान्देशश्री सन्मानाने सन्मानित करण्यात आले.

महोत्सवाच्या आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष विकास पाटील, उपाध्यक्ष प्रदीप अहिरे, एन.एम.भामरे, एल.आर.पाटील, दिगंबर बेंडाळे, सचिव दीपक पाटील, किशोर पाटील, सुभाष सरोदे, अमोल बोरसे, खजिनदार ए.जी.पाटील, संजय बिराले, एस.एन पाटील मंडळाचे सल्लागार भरत गाडे, रघुनाथ भदाणे, गणेश भामरे, सुनील चौधरी, मंगेश भामरे, सदस्य अनिरुद्ध चव्हाण, संदेश पाटील, सतीश पाटील, डी. पाटील, जितेंद्र सोनवणे, जगदीश पाटील, भूषण चौधरी, दीपक राजपूत, भरत पाटील, प्रशांत भामरे, किशोर पाटील, प्रसिद्धीप्रमुख सुनील इंगळे यांनी महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.

# थोडक्यात

## नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये मार्च महिन्यातील सेवानिवृत्तांचा सन्मान



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** सेवानिवृत्ती हा आयुष्यातील फक्त एक टप्पा असून यानंतरच्या काळात कामाच्या व्यस्ततेमुळे करायच्या राहून गेलेल्या आपल्या मनातील गोष्टींना, कुटुंबियांना भरपूर वेळ द्या, वेळेचे आणि अर्थकारणाचे योग्य नियोजन करा आणि आनंदी आयुष्य जगा अशा शब्दात परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांनी मार्च महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या ५ अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या. नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या या सेवानिवृत्ती सन्मान समारंभप्रसंगी उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्यासमवेत महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, भांडार विभागाचे उपआयुक्त शंकर खाडे, विधी अधिकारी अभय जाधव आणि अधिकारी, कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटूंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांनी जीवनाचे सार सांगणारी कविता सादर केली. तसेच शंकर खाडे आणि अभय जाधव यांनीही मनोगते व्यक्त करीत सेवानिवृत्तांना शुभेच्छा दिल्या. नवी मुंबई महानगरपालिका सेवेतून मार्च महिन्यात निवृत्त होणारे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता संजीव पाटील, उप मुख्य स्वच्छता अधिकारी सतीश सनदी, शिक्षिका पुष्पा वाघमारे, आरोग्य पर्यवेक्षक पांडुरंग येमले व जोडारी दत्तात्रय दैवज्ञ या ५ अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## मुख्यमंत्री यांच्या हस्ते महाबळेश्वर पर्यटन महोत्सव बोधचिन्हाचे अनावरण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व स्थानिक जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी २ ते ४ मे २०२५ या कालावधीत तीन दिवस महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार,पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी,पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसीचे मुख्य लेखा वित्त अधिकारी जितेंद्र सोनवणे उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे २ मे २०२५ रोजी उद्घाटन होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. पर्यटन विभाग व स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या तीन दिवसीय महोत्सवात प्रेक्षणीय स्थळे, स्थानिक कला–संस्कृती, खाद्य संस्कृतीची ओळख पर्यटकांना व्हावी आणि या माध्यमातून पर्यटन वृद्धी व्हावी हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

या महोत्सवात स्थानिक लोक संस्कृतीचा समावेश असलेले कार्यक्रम तसेच नामांकित कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्ट्रॉबेरी व कृषी पर्यटन महोत्सवाचे आयोजन,महाबळेश्वर परिसरातील उदा. पाचगणी, कास पठार, कोयनानगर, तापोळा, गड–किल्ले दर्शन व इतर पर्यटन स्थळ, दर्शन सहलीचे आयोजन,पर्यटकांसाठी विविध श्रेणीच्या तंबू निवास उभारणी करण्यात येणार आहे. पॅराग्लाडींग,पॅरामोटरींग, जलक्रिडा, ट्रेकींग,रॉक क्लायबींग,घोडेस्वारी आदी विविध साहसी उपक्रम राबविणे, स्थानिक बचत गटांचे हस्त कलाकृतीचे प्रदर्शन व विक्रीचे दालन उभारणी, स्थानिक पाककलाकृती संस्कृती व खाद्य महोत्सव दालन उभारणी, महाबळेश्वर येथील विविध प्रेक्षणीय स्थळे व पुरातन मंदिरांचे दर्शन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले आहेत. या महोत्सवात विशेषतः देशांतर्गत विविध राज्यातील पर्यटन क्षेत्राशी निगडीत भागधारक, प्रवासी संस्थांचे प्रतिनिधी,ट्रॅव्हल एजेंट,टूर ऑपरेटर्स,सोशल मीडिया प्रभावक यांना आमंत्रित करुन त्यांचा समावेश असलेल्या परिचय सहलीचे आयोजन करण्यात येईल. महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाटात वसलेले हे एक गिरीस्थान आहे. हे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर समुद्रसपाटीपासून सुमारे ४,५०० फूट उंचीवर वसलेले आहे. जुन्या बॉम्बे प्रेसीडेन्सीची ही पूर्वीची ऊन्हाळी राजधानीचे ठिकाण होते. येथील विलक्षण हिरवळ सुंदर बागा आणि श्वास रोखून धरणारे दृश्य हे पर्यटकांना भुरळ घालतात. ब्रिटीश काळात बांधलेल्या असंख्य भव्य वास्तू आजही गत स्मृतींची आठवण करुन देतात.

या ठिकाणी स्ट्रॉबेरी व्यतिरिक्त असंख्य नद्या,भव्य कॅस्केड, भव्य शिखरे, प्राचीन मंदिरे, बोर्डींग स्कूल, सुंदर आणि हिरवेगार घनदाट जंगल, धबधबे, टेकड्या व दऱ्यांसाठी देखील प्रसिद्धी आहेपर्यटकांसाठी पर्यटन महोत्सव कालावधीत विविध श्रेणींतील निवास व्यवस्था उपलब्ध असून येथे ५० निवासी टेंट पर्यटक आणि मान्यवरांसाठी उपलब्ध होणार आहेत. ट्रेकिंग, रॉक क्लाइंबिंग आणि घोडेस्वारी यासारख्या साहसी उपक्रमांचा अनुभवही पर्यटकांना घेता येईल. तसेच स्थानिक बाजारापेठांमध्ये फेरफटका, सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद आणि स्थानिक खाद्यसंस्कृतीचा आस्वादही पर्यटकांना घेता येईल. रोजच्या दिनक्रमातून दूर जात अनुभवसमृद्ध पर्यटनासाठी हा महोत्सव उत्तम पर्याय आहे.